# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र. : २६५९४०१३/१५ फॅक्स : २६५९१२६४
Website : https://mmrda.maharashtra.gov.in

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील संगणकचालक-नि-लिपिक संवर्गातील रिक्त पदे सामाजिक व समांतर आरक्षणांतर्गत सरळसेवेने कायमस्वरुपी भरण्याबाबत जाहिरात.

| पदाचे नाव व वेतनश्रेणी | पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व वय |
|---|---|
| **संगणकचालक-नि-लिपिक**<br>पी.बी.-१ रु.५२००-२०२०० + ग्रे.वे.रु.१९००/- | (अ) उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा आणि या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेल्या इतर परिक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार.<br>(ब) मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र अथवा शासनाने या उद्देशासाठी समकक्ष म्हणून घोषित केले आहे असे अन्य कोणत्याही संस्थेने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असेल असा उमेदवार.<br>(क) उमेदवाराने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे मान्यता दिलेल्या संस्थेतून MS-CIT परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>**वय** : १) मागासवर्गीय उमेदवारांचे वय ४३ वर्षे व खुल्या प्रवर्गाकरीता ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. प्राधिकरणातील कर्मचा-यांना वयाची अट लागू नाही.<br>२) माजी सैनिकांच्या बाबतीत संरक्षण दलातील ६ महिन्यापेक्षा जास्त सलग सेवा केली आहे अशा माजी सैनिकांचे वय वजा त्यांनी सशस्त्र दलात केलेली सेवा अधिक ३ वर्षे इतकी सवलत त्यांना देण्यात येईल.<br>३) प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/अपंग उमेदवारांसाठी शासन निर्णयानुसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील. |

| | अ.जा | अज | भ.ज (ब) | भज (क) | भ.ज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| माजी सैनिक १५% | ०१ | ०१ | – | – | – | – | ०२ | ०४ | ०८ |
| प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त ५% | – | – | – | – | – | – | ०१ | ०१ | ०२ |
| महिला (३०%) | – | – | ०१ | – | – | – | – | – | ०१ |
| अपंग (३%) (OL) | – | – | – | – | – | – | – | ०१ | ०१ |
| सर्वसाधारण | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | ०१ | १३ |
| एकूण | ०४ | ०२ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०७ | ०७ | २५ |

**सर्वसाधारण अटी :-**

(१) शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दिनांक १०.१०.१९८० व दिनांक १६.४.१९८१ नुसार माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरीता पात्र उमेदवार असावा. तसेच शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.आरटीए-१०९०-२२-प्र.क्र.६-९३-१२, दिनांक ८.६.१९९३ मधील तरतूदीनुसार माजी सैनिक उमेदवाराने माजी सैनिक घटकाच्या आरक्षणाचा लाभ घेऊन शासकीय सेवेत नोकरी स्विकारली असेल तर त्यास समांतर घटकाच्या लाभास पात्र राहणार नाही तो केवळ वयाची सवलत घेण्यास पात्र राहील.

(२) प्रकल्पग्रस्त उमेदवाराने नोकरीसाठी एकवेळ लाभ घेतल्यास त्यांना दुस-यांदा लाभ घेता येणार नाही.

(३) माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गात मोडणा-या उमेदवारांबाबत समांतर आरक्षणाच्या पृष्ठयर्थ सक्षम प्राधिका-याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा समांतर आरक्षणाचा लाभ दिला जाणार नाही. माजी सैनिकांनी डिस्चार्जकार्डच्या प्रमाणित सत्यप्रती सादर करणे आवश्यक राहील. युध्दकाळात किंवा युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या, अपंगत्व येऊन नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला माजी सैनिक आरक्षणात नियुक्ती देण्याची तरतूद महाराष्ट्र शासन सा.प्र.वि.शासन निर्णय दिनांक २ सप्टेंबर, १९८३ मध्ये आहे. सदर तरतूदीचा लाभ घेऊ इच्छिणा-या पात्र अर्जदारांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचा तसा दाखला संबंधित सैनिकाचा मृत्यू दाखला अथवा अपंगत्वाच्या कारणास्तव सेवेस अपात्र झाल्याचे प्रमाणपत्र तसेच सदर सैनिकांच्या कुटुंबातील आपण सदस्य असलेबद्दल तसेच यापूर्वी कुंटुंबातील अन्य कोणीही माजी सैनिक आरक्षणाखाली लाभ घेतला नसल्याबद्दलचे कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेल्या प्रतिज्ञापत्राची सत्यप्रत जोडावी. (तथापि अशा नेमणूकीचा प्राधान्यक्रम युध्दकाळात किंवा युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे अपंग झालेल्या माजी सैनिकांच्या नंतर राहील) हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील. अर्जदाराच्या हयात मुलांपैकी दिनांक २८ मार्च, २००६ नंतर तिस-या किंवा त्यानंतरच्या अपत्याचा जन्म झालेला नसावा. (अविवाहित अर्जदारानेसुध्दा सदरचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

..२/-

(४) अपंग व्यक्तींसाठी संबंधित प्रवर्गाचे किमान ४०% अपंगत्वाचे संबंधित जिल्हयाच्या शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकीय तज्ञाने दिलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

(५) जाहिरातीमधील समांतर आरक्षणांतर्गत महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या-त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

(६) उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक. (याबाबत माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र सादर करावे).

(७) शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दिनांक २८-३-२००५ नुसार नियम ४"अ" नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

(८) मागासवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत महाराष्ट्र शासनाच्या सक्षम अधिका-यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा जात वैधता प्रमाणपत्र नियुक्तीपासून ६ महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

(९) मागास प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिवास उमेदवारापुरतेच मर्यादित राहील. मागास प्रवर्गातील उमेदवारांनी महाराष्ट्रातील वास्तव्याबाबत सक्षम प्राधिका-याने दिलेले विहित अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(१०) इतर मागास प्रवर्ग, विजा/भज आणि विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उमेदवारांनी समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत वैध असलेली नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचा आरक्षित पदासाठी विचार केला जाणार नाही.

(११) सदर पदासाठी एमएस-सीआयटी अथवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तरापैकी कोणतीही एक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे हे अनिवार्य आहे. सदर अर्हता निश्चित केलेली असल्याने ते प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. विहीत प्रमाणपत्र नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९-३-२००३ नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विहीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. विहीत मुदतीत संगणक हाताळणी/वापराबाबतचे प्रमाणपत्र सादर न केल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यात येईल.

(१२) शासकीय सेवेत असलेल्या कर्मचा-यांनी त्यांच्या कार्यालयाचे **ना हरकत प्रमाणपत्र** सादर करणे अत्यावश्यक आहे.

(१३) पूर्णवेळ कामाचा अनुभव ग्राहय धरला जाईल. अर्धवेळ मानधनावरील सेवा ग्राहय धरली जाणार नाही.

(१४) निवड प्रक्रियेदरम्यान व तद्नंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद वा अयोग्य/अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

(१५) सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या आरक्षणांच्या संख्येमध्ये बदल झाल्यास आरक्षित पदांमध्येही बदल होणार असल्यामुळे त्याबाबत सक्षम प्राधिका-याचा निर्णय अंतिम राहील.

(१६) जाहिरातीस अनुसरुन उमेदवारांनी मे.महाऑनलाईन लि. यांचेमार्फत अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

(१७) सदर पदाकरीता पात्र उमेदवारांची प्राधिकरणामार्फत स्पर्धा परीक्षा घेण्यात येणार असून सदर परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व टंकलेखनाच्या परिक्षेचे प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येईल. तद्नंतरच टंकलेखन/संगणक परीक्षा घेण्यात येईल. अशाप्रकारे निवड झालेल्या उमेदवारांना नेमणूकीची देकारपत्रे निर्गमित करण्यात येईल.

(१८) प्राप्त अर्जांच्या संख्येनुसार रिक्त पदसंख्या विचारात घेता पात्र उमेदवारांची गुणांच्या आधारे निवडसूची बनविण्यात येईल.

(१९) उपरोक्त पदांकरीता जर प्रतिक्षासूची तयार करण्यात आली तर त्यातील निवड झालेल्या उमेदवारांचा आवश्यकतेनुसार नेमणूकीकरीता विचार करण्यात येईल. तथापि सदर प्रतिक्षासूची कोणत्याही परिस्थितीत एक वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता ग्राहय असणार नाही.

(२०) सदरहू जाहिरातीला अनुसरुन जे उमेदवार ऑनलाईन अर्ज करतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

(२१) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार निवड व नियुक्तीसाठी अपात्र ठरविला जाईल.

(२२) अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत उमेदवारांनी धारण केलेली अर्हताच विचारात घेतली जाईल. त्यानंतरची प्राप्त अर्हता विचारात घेतली जाणार नाही.

..३/-

(२३) जाहिरातीच्या अनुषंगाने कार्यवाही न करण्याचे वा ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी राखून ठेवलेले आहेत.

(२४) विहीत अर्हता पूर्ण करणा-या उमेदवारांनी, उपरोक्त अटींची पूर्तता होत आहे याची खातरजमा करुन, त्यांचे अर्ज Online पध्दतीद्वारे **सोमवार दिनांक** २७ **जून,** २०१६ पर्यंत maharecruitment.mahaonline.gov.in मार्फत सादर करावेत.

(२५) **माजी सैनिक या समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांनी आपला अर्ज व त्यासोबत आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रतीसह प्रशासकीय अधिकारी, नवीन इमारत, ८ वा मजला, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्याकडे अर्ज सादर करावेत.**

**दिनांक : ११ जून, २०१६**
**ठिकाण : मुंबई**

**अति.महानगर आयुक्त (१) /**
**प्रकल्प संचालक (मुं.ना.प.प्रकल्प)**
**मुं.म.प्र.वि.प्राधिकरण**

**MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY**
(A Govt. of Maharashtra Undertaking)
Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai – 400 051,
Tel. 26594013/15,Fax 26591264,
Website : https://mmrda.maharashtra.gov.in

**Advertisement for filling the posts of "Computer Operator cum Clerk" on permanent basis as per social and horizontal reservation in Mumbai Metropolitan Region Development Authority**

| Name of the Post, Pay Scale | Required Qualification |
|---|---|
| **Computer Operator cum Clerk**<br>PB-I Rs.5200-20200 + G.P. Rs.1900/- | (a) Minimum HSC or any other equivalent examination recognized by Government of Maharashtra.<br>(b) Should possess a speed not less than 30 w.p.m.in Marathi typing and 40 w.p.m. in English typing<br>(c) Candidates are required to pass MS-CIT<br>**Age : -** 1) 38 years for Open Category and 43 years for reserve category. (No age limit for MMRDA employees)<br>2) Ex-Serviceman who have put in not less than six months continuous service in the Armed Forces are allowed to deduct from their age the length of continuous service in the Armed forces plus 3 years.<br>3) Project / Earthquake affected / Handicap candidates not more than 45 years as per the Govt. Resolution. |

| | S.C. | S.T | N.T. (B) | N.T. (C) | N.T. (D) | S.B.C. | O.B.C. | Open | Total Posts |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Ex-Servicemen | 01 | 01 | – | – | – | – | 02 | 04 | 08 |
| Project Affected Person | – | – | – | – | – | – | 01 | 01 | 02 |
| Women | – | – | 01 | – | – | – | – | – | 01 |
| Handicapped(OL) | – | – | – | – | – | – | – | 01 | 01 |
| General | 03 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 04 | 01 | 13 |
| **Total** | 04 | 02 | 02 | 01 | 01 | 01 | 07 | 07 | 25 |

## General Terms & Conditions :-

1. Applicant should be eligible as ex-servicemen for government service under GoM, GAD's Circulars dated 10.10.1980 & 16.04.1981. As per GAD's Government Order No.RTA-1090-22-CR.6-93-12 dated 08.06.1993, if ex-servicemen has taken benefit earlier of ex-servicemen scheme for government service, then he will not be treated eligible for a ailment of the said benefit except age relaxation.

2. Ones project affected person has taken benefit of the scheme formulated for this category, he cannot take benefit for second time under same scheme.

3. Candidates belonging to Ex-servicemen/project affected/earthquake affected horizontal reserved category should submit their certificate issued by the competent authority of the same horizontal reserved category. Otherwise, applicant will not held eligible for benefit of the said scheme. It is essential to submit certified copy of discharge card by the ex servicemen. Under GoM, GAD, Government Order dated 02nd September, 1983, there is a provision to give appointment under ex-servicemen category to only one person from the families who have martyr during the service or become handicapped during the war and not found fit to perform the duties. Those who wanted to take benefit under this scheme should produce a certificate from District Sainik Welfare Officer to the effect that concerned ex-servicemen death certificate or the applicant is belonging from the said ex-servicemen family those who is now handicapped and do not perform any duties. Further, applicant should submit a true copy of affidavit made before Executive Magistrate that I am the member and no one as yet from the ex servicemen family has taken the benefit of ex servicemen scheme (however, preference/priority will be given for appointment to these applicants after considering the candidature of ex servicemen who become handicapped during war period or service period). It is obligatory to submit affidavit of the family numbers live in prescribed format. Applicant's third or subsequent child should not born after 28th March, 2006 (It is obligatory to submit the certificate by unmarried applicant).

4. Candidate should possesses 40% Disabled Certificate from the competent Government Medical Officer of Government Hospital of the concerned reserved category.

5. If women candidate is not found under the horizontal reserved category, then the same post will be filled from men candidature under the same category.

6. Candidate should have knowledge of Marathi language. (Candidate should submit S.S.C. Examination certificate.)

7. As per Rule 4 "A" of the Government Notification No.SRV-2000/CR(17/2000)Twelve, dated 28th March, 2005, the candidate require to submit an affidavit of having a small family along with the application.

8. The Backward Class candidate should have Valid Caste Certificate issued by the Competent Authority of Govt. of Maharashtra and should attach attested copy of Valid caste certificate. Otherwise, it is binding on the candidate to submit the Caste Validity Certificate within six months from the date of appointment.

9. The Backward Category reservation is applicable only to the candidates of Maharashtra State. A copy of domicile certificate issued by the competent authority is compulsorily required to be produced

10. Candidates applying under VJ/NT, Other Backward Class and Special Backward Class are required to produce non-creamy layer certificate valid upto 31st March, 2016.

11. Candidates are required to pass MS-CIT or one of the certificate examinations of CCC or O-level or A-level or B-level or C- level which is compulsorily additional qualification for all posts. Accordingly, shortlisted candidates are required to produce a copy of the Certificate. If the candidate does not have such certificate, then he/she should pass the said certificate examination within two years from the date of appointment according to the GoM's GAD GR No. Training 2000/ CR61/2001/39, dated 19th March, 2003. If the candidate fails to pass the said examination within the stipulated period, then his/her services would be terminated with immediate effect.

12. The candidates already employed in Govt. Sector, should compulsorily produce/submit his/her **No objection Certificate** from present employer.

13. The experience certificate of only full time work will be considered. The experience of part-time/honorarium service will not be considered.

14. The selection of the candidate is liable to be terminated/cancelled at any point of stage if the copies of certificate submitted by the candidate at the time of interview/selection or thereafter are found to be invalid, suspicious and/or incomplete.

15. Number of Posts indicated in the advertisement may increase/decrease depending on our requirements. Accordingly reserved posts will be changed. Decision of the Competent Authority will be Final.

16. Candidates should submit their applications through M/s. Mahaonline Ltd.

17. Eligible candidates will have to undergo a competiitive examination. Shortlisted candidates will have to submit their Educational Documents and Typing Certificates for verification. Afterwhich only eligible candidates shall appear the typing/computer based test. Final Selected candidates will be issued Offer letter.

18. Candidates will be shortlisted on the merit of each candidate with reference to number of applications received to the number of posts vacant.

19. Waiting list prepared, if any, on the basis of Merit, will be kept live for certain period depending on the requirement, however in any case, not beyond one year.

20. Applications received in response to this advertisement will only be considered and any previous applications forwarded will not be considered.

21. Recommendations and pressure for selection of candidates will not be entertained at any point of time. On the contrary, the said candidates who try to pressurize will be treated as ineligible for selection/appointment.

22. The educational qualification acquired at the time of filling up of the application will only be considered valid. Those certificates acquired after due date would not be considered valid.

23. This Authority reserves its right either to cancel/postpone the entire procedure in accordance with the advertisement or to cancel/postpone the advertisement, without any justification.

24. Candidates fulfilling above criteria shall fill up their Online application/s till Monday, **27th June , 2016** through **maharecruitment.mahaonline.gov.in**

25. Ex-servicemen candidates shall forward their application alongwith their relevant attested copies of certificates to the Administrative Officer, 8th Floor, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai – 400 051.

**Date : 11th June, 2016**
**Place : Mumbai**

**Sd/-**
**Addl. Metropolitan Commissioner (I)/**
**Project Director (MUTP)**
**M.M.R.D.A.**